विशेष लेख क्र. १२५ | १४ चैत्र शके १९२८(सायं. ५.३० वा.)
मंगळवार, दि. ४ एप्रिल २००६

# कोकणातील महिला बचत गटांची यशस्वी वाटचाल

*महिला बचत गटाच्या माध्यमातून सामान्य कुटुंबांच्या गरजा भागविल्या जातात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना समाजात सन्मानाने जगण्यासाठी बचतगट योजना लाभदायी ठरत आहे. बचत गट केवळ बचत करत नाही, तर त्यामधून सभासदांच्या छोट्या-छोट्या गरजा भागविल्या जातात. बचत गटाच्या माध्यमातून अधिक रकमेची कर्ज उभारणीही होऊ शकते. महिलांच्या आर्थिक विकासाला चालना देणारी ही योजना. . .*

महाराष्ट्रात विविध जाती-जमातीच्या, आर्थिक दुर्बल घटकातील महिलांचा आर्थिक विकास करण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून शासन प्रयत्नशील आहे. त्यातूनच महिला बचत गट योजनेअंतर्गत स्वयंरोजगाराची संकल्पना साकारत आहे. 'बचत गट योजना' ही कुटुंबाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारी व समाजात पत निर्माण करणारी योजना आहे. ही योजना कर्नाटक राज्यात १९८६-८७ साली रुजली. प्रथम स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून सुरु झाली. त्यानंतर समूह बचतीतून कर्ज पुरवठा हा विचार महाराष्ट्रातही रुजला. बचत गटामुळे महिलांनी केलेली बचत सुरक्षित व कुटुंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देणारी असल्यामुळे ही योजना फायदेशीर ठरली आहे.

बचत गटाच्या माध्यमातून कमी भांडवली व्यवसायास संधी प्राप्त होते. महिला बचत गटामुळे समाजातील पत जी पैशात मोजता येत नाही, पण सुखी करण्यास मदत होते. यासाठी महिलांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. ठाणे जिल्ह्यातील तीन आदिवासी तालुक्यात ७५० महिलांना ३० गटांमध्ये संघटित करुन प्रत्येक गटामागे एक महिला कार्यकर्तीला प्रशिक्षित करण्यात आले आहे. अशाच प्रकारची योजना रायगड जिल्ह्यात खेड व सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैभववाडी तालुक्यात सन २००३-०४ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे. हे प्रशिक्षण महिलांना संघटनामार्फत महिन्यातून एकदा देण्यात येते. ग्रामीण भागात जे शेतीशी निगडित उद्योग हाती घेता येतील त्यासाठी प्रति लाभार्थी, भांडवली अनुदान देऊन घरगुती उद्योग उभे करुन स्वयंरोजगाराला चालना देण्यात येत आहे. यामध्ये विविध कृषी उद्योग, कृषी बियाणे उत्पादन, प्रक्रिया केंद्र, कृषी उत्पादनासाठी कमी खर्चाची हरितगृहे उभारणे असे अनेक प्रकल्प या बचत गट योजनेतून उभे करता येतील. यापैकी कांही प्रकल्प चालविण्यासाठी ग्रामीण युवक आणि महिलांना प्रशिक्षणही देण्यात येत आहे. या प्रशिक्षण स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून संघटीत होऊन आगामी आर्थिक वर्षात असे प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.

सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात ठाणे जिल्ह्यातील वाडा, पालघर, डहाणू या प्रत्येक तालुक्यातील २५ महिलांचा एक गट याप्रमाणे १० गट करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यात २५० शेतकरी महिलांची निवड करण्यात आली असून त्यात अल्प, अत्यल्प भूधारक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व आदिवासी महिला शेतकरी यांचा समावेश आहे. महिला शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी महिला प्रवर्तकांची उजळणी, प्रशिक्षण, महिलांचे गावपातळीवर प्रशिक्षण, संपर्क, कार्यकृतीचे प्रशिक्षण, महिला प्रवर्तकांचा मासिक चर्चासत्रात सहभाग, प्रात्याक्षिके, शैक्षणिक अभ्यास दौरा, महिला गट संघटन मजबुतीकरण, महिला गटांना शैक्षणिक साहित्याचा पुरवठा यासाठी आठ लाख ९५ हजार रुपये खर्च आलेला आहे.

..२/-

ठाणे जिल्हयाच्या धर्तीवर सन २००४-०५ मध्ये रायगड जिल्ह्यातील सुधागड(पाली) तालुक्यात, रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वैभववाडी या तीन तालुक्यात महिलांचा सहभाग कृषिक्षेत्रात वाढविण्यासाठी ५० लाख ५९ हजार रुपये खर्च झालेला आहे.

बचतगट योजना अस्तित्त्वात आल्यापासून कोंकण विभागात १२ हजार ४४६ बचत गटाची स्थापना झालेली आहे. ठाणे जिल्ह्यात तीन हजार २७१ बचत गट स्थापन केलेले आहेत. खेळते भांडवल दिलेले दोन हजार ९९६ बचत गट आहेत, व्यवसाय सूरु केलेले एक हजार ८७ बचत गट आणि महिलांचे एकूण दोन हजार ६८७ बचत गट त्यात महिलांनी व्यवसाय सुरु केलेले ६२३ बचत गट आहेत. रायगड जिल्ह्यात स्थापना केलेले बचत गट एक हजार ९९० आहे. खेळते भांडवल दिलेले बचत गट एक हजार०२५, व्यवसाय सुरु केलेले बचत गट ५३३ तर महिलांचे एकूण बचत गट एक हजार ८९५ त्यात महिलांनी व्यवसाय सुरु केलेल्या बचत गटाची संख्या ५१० आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या बचत गटाची संख्या चार हजार १०५ आहे. त्यात खेळते भांडवल दिलेले बचत गट एक हजार ८०९, व्यवसाय सुरु केलेले बचत गट ५६३, महिलांचे एकूण बचत गट दोन हजार ५३६, महिलांनी व्यवसाय सुरु केलेले बचत गट १६४ तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्थापन केलेल्या बचत गटाची संख्या एक हजार ३७५, व्यवसाय सुरु केलेल्या बचत गटाची संख्या ३८८ व महिलांच्या एकूण बचत गटाची संख्या तीन हजार ०८० असून त्यात खेळत भांडवल दिलेल्या बचत गटाची संख्या एक हजार ५९३ असून त्यात महिलांनी व्यवसाय सुरु केलेल्या बचत गटाची संख्या २२२ असे एकूण आठ हजार ७११ महिला बचत गटाच्या निर्मितीत महिलांचे व्यवसाय सुरु केलेल्या बचत गटाची एकूण संख्या ३१ जानेवारी ०६ अखेर एक हजार ५१९ एवढी आहे.

महिला बचत गटाच्या माध्यमातून शहरी, ग्रामीण भागात किराणा दुकान, भाजीपाला विक्री, इस्त्रीचे दुकान असे अनेक कमी भांडवलात सुरु करता येणारे व अधिक उत्पन्न देणारे व्यवसाय सुरु करता येतात. महिला गटातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक फायदे होतात. एकत्रित महिलांना अशा गटाद्वारे एकमेकींना मदत करण्याची, सहकाराची, एकतेची भावना वाढीस लागते. यामुळे एकमेकात राष्ट्रीय एकतेच्या कर्तव्याची साखळी आणि हक्काची सुरक्षितता वाढीस लागते. बचत गट योजना एक सक्षम तसेच महिलांची आर्थिक उन्नती करणारी योजना आहे. ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून समाजात पत व स्वयंरोजगार निर्मितीसाठी अधिकाधिक संख्येने एकत्रित येऊन लाभ घ्यावा, ज्यातून त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

वि.प्र. साळुंके,
माहिती सहाय्यक,
वि.मा.का., नवी मुंबई.

०००